## प्रेसनोट

ला.प्र. विभाग, धुळे
दिनांक ०६.०१.२०२६

**साहिल मन्यार, तंत्रज्ञ, म.रा.वि. वितरण कंपनी, उपविभाग नरडाणा, ग्रामीण कक्ष क्र.०१, ता. शिंदखेडा, जि. धुळे यांनी तक्रारदार यांचेकडे ५००/— रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्वत: स्विकारल्याने गुन्हा**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | धुळे |
| **पो. ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक** | नरडाणा पो.स्टे. गुरनं.०३/२०२६ |
| **कलम व गुन्हा दाखल दिनांक** | भ्र.प्र. कायदा कलम ७ प्रमाणे, दि.०६.०१.२०२६ |
| **आरोपीचे नांव, वय व कार्यालय** | साहिल मेहमुद मन्यार, वय २१ वर्षे, तंत्रज्ञ, उपविभाग नरडाणा, ग्रामींण कक्ष क्र.०१, ता. शिंदखेडा, जि. धुळे, रा. वर्षी, ता. शिंदखेडा. जि. धुळे |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | ५००/— रुपये |

**थोडक्यात हकिगत :—** तक्रारदार यांच्या बहिणीने नरडाणा येथील गांधी चौकात ग्रामपंचायतीच्या जागेतील दुकानात ब्युटी पार्लरच्या व्यवसायाकरीता वाणिज्य कनेक्शन मिळणेकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कपंनीकडे ऑनलाईन अर्ज करुन तक्रारदार यांनी दि.२४.१२.२०२५ रोजी विज कनेक्शनचे कोटेशन भरुन आवश्यक ते कागदपत्र म. रा.वि.वि. कंपनी नरडाणा उपविभाग कक्ष क्र. ०१ येथे जमा केले होते.

तक्रारदार हे बहिणीच्या ब्युटी पार्लरच्या दुकानाचे विज कनेक्शन जोडणीकरीता वेळोवेळी म.रा.वि.वि. कंपनीच्या कार्यालयात जावुन पाठपुरावा करीत होते. त्यानंतर दि.०६. ०१.२०२६ रोजी आलोसे यांनी नविन विज कनेक्शनची जोडणी करुन तक्रारदार यांना त्यांच्या आईच्या फोन वरुन फोन करुन विज मिटर बसविल्याच्या मोबदल्यात ५००/— रुपये लाचेची मागणी केल्याची माहिती तक्रारदार यांनी दुरध्वनीव्दारे ला.प्र.वि. धुळे कार्यालयास दिली होती.

त्यावरुन धुळे ला.प्र. विभागाच्या पथकाने नरडाणा येथे जावुन तक्रारदार यांची तक्रार लिहुन घेतली होती. सदर तक्रारीची दि.०६.०१.२०२६ रोजी पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे पंचांसमक्ष ५००/—रू लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम सापळा कारवाई दरम्यान पंचासमक्ष स्वत: स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| **सापळा पर्यवेक्षण अधिकारी** | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. धुळे |
| **सापळा अधिकारी** | श्रीमती पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक |
| **सापळा पथक** | यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. धुळे<br>पोहेकॉ. राजन कदम, मुकेश अहिरे, संतोष पावरा, पोकॉ. मकरंद पाटील, प्रविण पाटील, सागर शिर्के, प्रितेश चौधरी, पोहेकॉ. सुधीर मोरे, जगदीश बडगुजर, ला.प्र.वि. धुळे |
| **मार्गदर्शन** | १) मा. श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक<br>२) मा. श्री. माधव रेडडी, अपर पोलीस अधीक्षक<br>३) मा. श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक,<br>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय/ निम शासकिय अधिकारी / कर्मचारी अथवा खाजगी पंटर यांनी काम करुन देण्यास लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे संपर्क साधावा.**

**संपर्क पत्ता** :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे
**संकेतस्थळ** :— acbmaharashtra.gov.in
**ईमेल** :— dyspacbdhule@gmail.com
**टोलफ्री क्रमांक** :— १०६४
**दुरध्वनी क्रमांक** :— ०२५६२—२३४०२०

पोलीस उप अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो ★ धुळे ★ सत्यमेव जयते

(सचिन साळुंखे)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,धुळे.